जनहितकारी पेटंट कायदा

प्रा. रावसाहेब घेगडे

जागतिक बौद्धिक संपदा दिवस रविवारी (२६ एप्रिल) साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भारतीय औषध उद्योग तसेच भारतीय पेटंट कायद्यातील काही महत्त्वाच्या बदलांचा घेतलेला हा आढावा.

निमित्त

मलेरियावर वापरल्या जाणाऱ्या हायड्रोक्सीक्लोरोक्वीन या औषधाची मागणी आज ५५ हून अधिक देश भारताकडे करीत आहेत. अमेरिका, युरोपीय राष्ट्र तसेच ब्राझीलसारखे लॅटीन अमेरिकन राष्ट्रही या औषधासाठी आपल्याकडे डोळे लावून आहेत. या सर्व देशांची आरोग्य व्यवस्था आपल्या देशापेक्षा खूपच विकसित आहे. मग भारताकडे या औषधाची मागणी का केली जाते? याचे उत्तर असे आहे की, आपल्या औषध उद्योगाने स्वातंत्र्यानंतर जेनेरिक औषध निर्मितीमध्ये केलेली वाखाणण्याजोगी कामगिरी. यामध्ये सिंहाचा वाटा आहे तो भारतीय पेटंट कायद्याचा.

१९११ साली भारतीय पेटंट व डिझाइन कायदा, ब्रिटिश सरकारने संमत केला. स्वातंत्र्यानंतर सुधारित केलेल्या या कायद्याचा मसुदा १९७० मध्ये तयार होऊन लोकसभेत तो पारित करण्यात आला व त्याची अंमलबजावणी १९७२ पासून करण्यात आली. कुठल्याही औद्योगिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण आविष्कारांना, संबंधित संशोधकास सरकार मर्यादित कालावधीसाठी एकस्व अधिकार (Monopoly right) देते. ज्यात इतर कोणालाही तसे घटक अथवा पदार्थ बनविणे, विकणे, निर्यात करणे, बनविण्यास परवाना देणे, याला मनाई असते. यालाच पेटंट म्हणतात. उरुग्वे येथे झालेला गॅट करार जागतिक व्यापार व त्यावरील कराशी निगडित होता. या करारामध्ये परकीय व्यापार करताना बौद्धिक संपदेशी (IP-Intellectual Property) निगडित वस्तूंचा व्यापार करण्यासंबंधी काही निकष अधोरेखित करण्यात आले. त्याला TRIPS (Trade Related Aspects of Intellectual Property Rights) करार म्हणतात. विकसित देशांना १९९५ पासून या करारातील अटींचा अवलंब करणे बंधनकारक होते. भारतासारख्या विकसनशील देशांना मात्र दहा वर्षांचा अतिरिक्त कालावधी या अटी लागू करण्यास देण्यात आला. या सवलतींमुळे आपण आपले बौद्धिक संपदा कायदे सुधारित करून घेतले. तसेच ट्रेडमार्क कायदा, भौगोलिक निर्देश कायदा, भारतीय डिझाइन कायदा तयार केला व पेटंट कायद्यामध्ये १९९९, २००२ व २००५ अशा टप्प्याटप्प्याने सुधारणा केल्या.

१९११ चा पेटंट कायदा ब्रिटिशशासन धिष्टीत होता. त्यातील त्रुटी दूर केल्याने भारतीय औषध निर्मितीस वेग आला. त्यामुळे १९८७ च्या आसपास प्रगत देशांच्या तुलनेत आपण खूप स्वस्त औषधे देऊ लागलो. १९७० ते १९९० मध्ये आपण १० प्रॉडक्ट पेटंटवरील औषधे तसेच १९९० ते १९९५ मध्ये ९९ प्रॉडक्ट पेटंटच्या जेनेरिक आवृत्ती बनविल्या. TRIPS कराराच्या सवलतीमुळे मिळालेली दहा वर्षे भारतीय औषध उद्योगांच्या दृष्टीने सुवर्णकाळ ठरली. पेटंट कायद्यातील १९९९ च्या सुधारणेत चढ्या किमतीने विकली जाणारी औषधे भारताने आपल्या कंपनीमार्फत स्वस्तात म्हणजेच जेनेरिक किंवा कॉपीकॅट स्वरुपात वाजवी दरात उपलब्ध करून दिली. २००२ मध्ये केलेली सुधारणाही महत्त्वाची ठरली. कुठल्याही जागतिक अथवा देशांतर्गत आरोग्य आणीबाणीत, साथीच्या अथवा महामारीच्या आजारांना राष्ट्रीय आपदा घोषित करून त्यासंबंधातील औषधे वाजवी दरात उपलब्ध करून देण्याची व जे देश बाधित आहेत, त्या अविकसित देशांना त्यांच्या विनंतीनुसार निर्यात करण्याची सवलत देण्यात आली. यातील काही तरतुदींमुळे भारत महामारी अथवा साथीच्या आजारात भारतासह इतर अविकसित व गरीब महामारीबाधित देशांना स्वस्त जेनेरिक औषधे पुरवू लागला. २००५ मधील सुधारणेने औषध क्षेत्रातील बदलात अजून महत्त्वाचे टप्पे गाठले. यामध्ये अन्न व औषध क्षेत्रात प्रॉडक्ट पेटंट लागू केले गेले. तसेच अजून काही महत्त्वाच्या बदलांमुळे भारताने आपला पहिला अनिवार्य परवाना नाटको फार्मास्युटिकल या कंपनीस दिला. ज्यामुळे कॅन्सरवर एका महिन्यात वापरले जाणारे २ लाख ८४ हजार रुपयांचे औषध ८८०० पर्यंत येऊन पोहोचले.

पेटंटसाठी उपयुक्त ठरलेल्या एका महत्त्वाच्या निर्णयाने अनेक बदल घडले. कुठलेही औषधी पेटंट भारतीय पारंपरिक औषधी ज्ञानाच्या वापरातून तसेच पारंपरिक औषधाचा किंवा त्याच्या घटकांचा संशोधनामध्ये उपयोग करून, तसेच पारंपरिक औषधांचे ज्ञान असणाऱ्या समुदायाला डावलून घेतलेले असल्यास त्यास रद्दबादल करण्याचा हा निर्णय होता. परिणामी १९९६ मध्ये भारतीय वंशाच्या संशोधकास अमेरिकन पेटंट ऑफिसने जखम बरी करण्यासाठी होणाऱ्या हळदीच्या उपयोगाकरिता पेटंट दिले. भारताने डॉक्टर रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली या पेटंटवर अमेरिकेच्या कोर्टात लढा देऊन भारतास हळदीचे पेटंट परत मिळवून दिले. युरोपीय देशांत दिले गेलेले कडुलिंब वरचे पेटंटही आपण परत मिळवले.

जेनेरिक औषधांची निर्मिती भारत प्रभावीपणे करीत आहे. २७ बिलियन अमेरिकी डॉलर मूल्य असलेल्या भारतीय औषध उद्योगात ६०-७० टक्के जेनेरिक औषधांचा वाटा आहे. नवीन कुठलेही औषधीय मूलद्रव्य बाजारात येण्यासाठी जवळपास दहा ते पंधरा वर्षांचा संशोधन प्रवास तसेच ७० हजार कोटी ते दीड लाख कोटी रुपये खर्च येतो. भारत मूलभूत मूलद्रव्य शोध लावू शकत नाही, असे नाही परंतु काही अडचणींमुळे भारतीय कंपन्या ते करत नाहीत. त्याऐवजी आपण पेटंटेड औषधाशी जैव साधर्म्य (bioequivalence) असलेले जेनेरिक औषध निर्माण करतो. भारत संपूर्ण जगाला २० ते २२ टक्के जेनेरिक औषधांचा पुरवठा करणारा देश आहे. आपला देश अमेरिकेला ४० ते ४५ टक्के बल्क ड्रग, २०० टक्के युरोपीय देशांना जेनेरिक औषधे, अफ्रिकेतील जवळपास सगळ्या देशांना स्वस्तात जेनेरिक औषधे तसेच आशियाई देशांना १९ टक्क्यांपर्यंत औषधांचा पुरवठा करतो. भारताने परिस्थितीनुसार प्रत्येक वेळेस आपल्या पेटंट कायद्यामध्ये बदल करून फक्त आणि फक्त लोकांच्या हिताचे व समस्त मानव जातीचे कल्याण बघितले आहे.

(लेखक पेटंट समुपदेशक व सल्लागार आहेत.)